# Punyanagari

## Cholamandalam Invest Q2 net up 27% to Rs 120 crore

**Date: 02/11/2015 | Edition: Mumbai | Page: 10 | Source: Bureau | Clip size (cm): W: 5 H: 9**

India Media Monitor




### चोलामंडलमच्या नफ्यात २७ टक्क्यांनी वाढ

**मुंबई :** चोलामंडलम गुंतवणूक आणि वित्त कंपनीच्या संचालक मंडळाने ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या सहामाहीचे लेखापरीक्षण केलेले आर्थिक निकाल आणि ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षण न केलेले आर्थिक निकाल मंजूर केले. यामध्ये आर्थिक वर्ष २०१६च्या दुसऱ्या तिमाहीचा करपश्चात नफा १२० कोटी रुपयांवर पोहचला आहे. २०१५च्या दुसऱ्या तिमाहीच्या तुलनेत त्यामध्ये २७ टक्क्यांची वाढ झाली आहे. त्याचबरोबर सहामाहीसाठी करपश्चात नफा २३१ कोटी रुपयांवर गेला असून त्यामध्ये गतवर्षीपेक्षा २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०१६च्या दुसऱ्या तिमाहीत निधी वितरण ३६७२ कोटी रुपयांवर गेला आहे.